नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
शाखा कार्यालय, वर्धा

दुरध्वनी क्र. 07152-242639
E-Mail. townplanner1wardha@rediffmail.com

जिल्हा क्रीडा संकुल, डॉ. आंबेडकर चौक,
सिव्हील लाईस्, वर्धा-442001

जा.क्र.बांध.पर./मौ.पिपरी (मे)/ता.वर्धा/स.क्रं.39/3,41/2,42/2,3 /नरव/ 759 दिनांक :- 18 /04/2019

प्रति,
उपविभागीय अधिकारी,
वर्धा.

विषय : बांधकाम परवानगीबाबत.

मौजा पिपरी (मे) ता.जि. वर्धा येथील स.क्रं. 39/3,41/2,42/2-3 भुखंड क्र. 'अ' व 'ब' च्या अभिन्यासातील क्षेत्र 651.40 चौ.मी. (रहिवासी/ वाणिज्य) इमारती करीता बांधकाम नकाशे मंजूरीबाबत.

अर्जदार : श्री. हर्षद राजेंद्र मिसाळ

संदर्भ :- 1) वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार, म्हाडा यांचे पत्र क्र. ना.मं./मु.अ./3085/2018/ वाशावनि दि. 25/05/2018
2) या कार्यालयाचे पत्र क्र. ना.गृ.क्षे.मं./बा.न./मंजुरी/नरव/1241 दि. 02/07/2018
3) वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार, म्हाडा यांचे पत्र क्र. ना.मं./मु.अ./4005/2018/ वाशावनि दि. 25/07/2018
4) आपले पत्र क्र.प्रस्तु-3/उविअ/काबि- 433/2018, दिनांक 14/08/2018

संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये विषयांकित भूखंडावर बांधकाम नकाशे मंजुरी बाबत प्रकरण प्राप्त झाले परंतू त्यामध्ये त्रृट्या असल्याने त्रृटीपूर्णता करुन विहीत मार्गाने प्रकरण सादर करणेबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये अर्जदारास कळविण्यात आले. संदर्भिय पत्र क्र. 3 व 4 अन्वये त्रृटीपूर्तता करुन पुनश्च प्रकरण विहीत मार्गाने या कार्यालयास प्राप्त झाले. विषयांकित प्रकरणी सविस्तर पडताळणी केली असता, विषयांकित जागेवरील भूखंड एकत्रीकरणाला यापूर्वी या कार्यालयाने पत्र क्र. 1555, दि.27/06/2018 अन्वये रहिवासी वापराकरीता मंजूरीची शिफारस केलेली आहे.

प्रकरणासोबत सलंग्न उक्त जागेतील उक्त भुखंडावरील बांधकाम नकाशांची छाननी केली असता आवेदकाने सादर केलेले बांधकाम नकाशे विकास नियंत्रण नियमावलीनुसार सर्वसाधारणपणे योग्य असून सदर बांधकाम नकाशास लाल रंगाने केलेल्या दुरुस्तीसह खालील अटींवर मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे. शासन निर्देश क्र.टिपीएस-1808/1254/प्र.क्र. 1257/08/नवि-13,दि. 10/02/2010 अन्वये अर्जदाराने बांधकाम नकाशा छाननी शुल्क तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,1966 चे कलम 124 ब नुसार छाननी शुल्क व विकास शुल्क असे एकुण रू.91250/- (रू. एक्यानव हजार दोनशे पंन्नास फक्त) शासकिय खजिन्यात चलान क्र.549085 दि.16/04/2019 रोजी जमा केले आहे. तसेच अतिरिक्त बांधकामा करीता 30% अधिमुल्य रु. 24350/-चलान क्र. 60931720 दि. 18/04/2019 रोजी शासन जमा केले आहे.

1) विषयांकित जागेच्या अभिन्यासाला **उपविभागीय अधिकारी, वर्धा** यांचे भूखंड एकत्रीकरणसाठी आदेश क्र.प्र.क्र.211/एमआरसी/80/18 दि.05/10/2018 अन्वये परवानगी प्रदान करण्यात आली आहे. या अभिन्यासातील भूखंडावर करण्यात येणाऱ्या बांधकामास या आदेशातील अटी बंधनकारक राहतील.
2) या बांधकाम परवान्याची मुदत परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाची आहे. या कालावधीत बांधकाम पुर्ण न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यांत यावे. नुतनीकरण प्रत्येक वर्षाची मुदत संपण्यापुर्वी मुदतवाढ घेवून **तीन वर्षा** पर्यंत मंजूर करता येईल.
3) बांधकाम सुरु करण्यांत येत असल्याबाबतची सुचना **उपविभागीय अधिकारी, वर्धा** या कार्यालयास विहीत नमुन्यात (Appendix "A"-Item-4 मध्ये) देण्यात यावी.
4) जोत्या पर्यंत (Plinth level) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर याबाबतची माहिती विहीत नमुन्यात (Appendix "F" मध्ये) **उपविभागीय अधिकारी, वर्धा** या कार्यालयास व नगर रचनाकार कार्यालयास देण्यांत यावी. याप्रमाणे सदर कामास नगर रचनाकार कार्यालयाने विहीत नमुन्यात (Appendix "G" मध्ये) प्रमाणित केल्यानंतर पुढील काम सुरु करण्यांत यावे.
5) उपयोगिता प्रमाणपत्र (Occupancy Certificate) मंजूर झाल्याशिवाय नविन इमारत किंवा इमारतीचा कोणताही हिस्स्याचा उपभोग करण्यांस किंवा उपभोग करण्याची मंजूरी किंवा कोणत्याही व्यक्तिला वापर करण्याचा परवाना देता येणार नाही. तसे

वर्धा-१
UNIT-1
७६७/२०
२८/१९२२

केल्यास अनधिकृत उपभोग केल्याबाबत अर्जदार आणि आर्किटेक्ट/अभियंता हे गुन्हयास पात्र ठरतील. उपयोगिता प्रमाणपत्राकरीता इमारत मालक व आर्किटेक्ट यांनी अपेंडीक्स (H) मध्ये बांधकाम पुर्ण झाल्याच्या नकाशाच्या प्रतिसह अर्ज **उपविभागीय अधिकारी, वर्धा** यांचेकडे सादर करावा.

6) ग्राम पंचायत **पिपरी (मेघे) ता. वर्धा** यांची मंजुरी/नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय बांधकाम करण्यांत येवू नये. मंजुर बांधकाम नकाशाविरूध्द कोणतेही बांधकाम केल्यास ते अनधिकृत गृहीत धरण्यांत येईल याची नोंद घ्यावी. अनधिकृत बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,1966 नुसार जमिन मालक / विकासकर्ता व आर्किटेक्ट कार्यवाहीस पात्र ठरतील.

7) महाराष्ट्र प्रादेशिक योजनेच्या संबंधातील मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक संपुर्ण सॅनिटरी कार्य पुर्ण करण्यात यावे.

8) सिव्हर लाईनला पावसाच्या पाण्याची पाईप लाईन जोडण्यांत येवू नये आणि त्याकरिता विकासकर्त्याने स्वतंत्र व्यवस्था करावी.

9) संबधित नियोजन प्राधिकरण कार्यालयाचे किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा नगर रचना अधिकारी यांचे पडताळणी करिता ईमारतीचे बांधकाम सुरू असतांना मंजुर बांधकाम नकाशे नेहमी साईटवर उपलब्ध ठेवावेत.

10) महाराष्ट्र प्रादेशिक योजनेच्या संबंधातील प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीतील संपुर्ण तरतुदी विकासकर्त्यास बंधनकारक राहतील.

11) भुखंडात पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

12) भुखंडावरील रिकाम्या जागेत विकासकर्त्याने नियमानुसार किमान आवश्यक झाडे लावावी व ती झाडे मोठी होतपर्यंत त्यांचे संगोपन करावे.

13) पाण्याची आणि सिव्हेज डिस्पोजलची व्यवस्था विकासकर्त्यास स्वत:करावी लागेल.

14) भुखंडाच्या कडेला योग्य आकाराच्या व रस्त्यापासुन जवळ असेल अशा कचऱ्यांच्या टोपल्यांची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

15) जर नकाशात दर्शविलेल्या गणकपत्रकात/आकडेमोड (कॅलक्युलेशन्स) मध्ये विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी विसंगत अशी चुक/दोष आढळल्यास, ईमारतीचा/बांधकामाचा तो भाग जो नियमात बसत नाही तो अनधिकृत ग्राहय धरल्या जाईल.

16) बांधकामाच्या साहित्याची अशा तऱ्हेने व्यवस्था करावी जेणेकरून त्यामुळे ड्रेन, पावसाचे पाणी व वाहतुक इ. ना अडथळा निर्माण होणार नाही. यामुळे अडथळा निर्माण झाल्यास संबधित नियोजन प्राधिकरण यांचे तर्फे कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

17) बांधकाम परवानगी करीता सादर केलेल्या मालकी हक्क व इतर कागदपत्रांमध्ये काही दोष असल्यास अथवा सदरची कागदपत्रे खोटी व दिशाभूल करणारी असल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यांत येईल. तसेच याबाबत परवानगी धारकास जबाबदार धरुन भारतीय दंड विधान संहितेच्या तरतुदीनुसार फौजदारी कारवाईस पात्र धरण्यात येईल.

18) स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी (Structural Stability) संबंधी सक्षम स्थापत्य अभियंत्याकडील प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे.

19) नकाशे व आराखडे तयार करुन आराखडयानुसार सक्षम स्थापत्य अभियंत्याचे देखरेखीखाली बांधकाम पूर्ण करुन घेण्याची व त्याप्रमाणे बांधकाम हे भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या तरतुदीनुसार पूर्ण करुन घेण्याबाबत सक्षम अभियंत्याचा वास्तुशास्त्रज्ञाचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. (Appendix "B" मध्ये)

20) उक्त वापराचे अनुषंगाने सौर ऊर्जेवर पाणी तापवण्याची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

21) नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणत्याही वहिवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालकाने घेतली पाहिजे.

22) वरील अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटींचा अगर शर्तीचा भंग केल्यास आदेश रद्द समजण्यात येईल.

सहपत्र : बांधकाम परवानगी शिफारस नकाशे (तीन प्रती)

(सु.च.देशमुख)
नगर रचनाकार
नगर रचना, शाखा कार्यालय, वर्धा

प्रत:
वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार (अ.का.), नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर.

वरुड - १
WARD - १
०६/०१/२०
२१/१/२२

1420-1845

वाचले :-1) अर्जदार श्री.हर्षद राजेंद्र मिसाळ यांचा बांधकाम परवानगी मिळण्याबाबतचा अर्ज दिनांक 14/08/2018
2)नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, वर्धा यांचे पत्र जा.क्र.बांध.पर./मौ.पिपरी (मे)/ स.क्र.39/3,41/2,42/2,3/ ता.वर्धा/नरव/759 दि. 18/04/19

क्र.प्रस्तु-3/बांधकाम/उविअ/कावि/S.R. 57 /2019
कार्यालय उपविभागीय अधिकारी, वर्धा
दिनांक :-26/4/2019

प्रति:

श्री.हर्षद राजेंद्र मिसाळ
रा. पिपरी (मे) ता.वर्धा, जि.वर्धा

विषय:- बांधकाम परवाना मंजुरीबाबत आदेश.
मौजा **पिपरी (मे)** ता.वर्धा येथील स.क्र. 39/3,41/2,42/2,3 भुखंड क्र. 'अ' व 'ब' बाबत

"ज्याअर्थी अर्जदार **श्री.हर्षद राजेंद्र मिसाळ** रा. **पिपरी (मे)**ता.वर्धा यांनी **पिपरी (मे)** येथील स.क्र. 39/3,41/2,42/2,3 भुखंड क्र. 'अ' व 'ब' च्या अभिन्यासातील क्षेत्रामध्ये रहिवासी/वाणिज्य प्रयोजनार्थ ईमारत बांधकाम आराखड्यास मंजुरी देवुन बांधकाम परवाना मिळणेबाबत अर्ज या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. अर्जदार यांनी सादर केलेल्या ईमारत बांधकाम आराखड्यास नगर रचनाकार, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, शाखा कार्यालय, वर्धा यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. बांध.पर./मौ. **पिपरी (मे)** / स.क्र. 39/3,41/2,42/2,3 / ता.वर्धा/नरव/759 दिनांक 18/04/2019 अन्वये सदर बांधकाम नकाशामध्ये लाल रंगाने केलेल्या दुरुस्तीसह अटी व शर्तीसह मंजुरीची शिफारस केलेली आहे.

अ.क्र.	गावाचे नाव	जमिन मालकाचे नाव	जमिन गट नं. व भुखंड क्र.	7/12 प्रमाणे भुखंडाचे क्षेत्र चौ.मि.	बांधकाम नकाशे मंजुर क्षेत्र चौ.मि.
1	**पिपरी (मे)** ता.वर्धा	**श्री.हर्षद राजेंद्र मिसाळ**	स.क्र. 39/3,41/2,42/2,3 भुखंड क्र. 'अ' व 'ब'	651.40 चौ.मी.	802.63 चौ.मी

त्याअर्थी मी, उपविभागीय अधिकारी, वर्धा, उपविभाग वर्धा मला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,1966 चे कलम 18 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मौजा **पिपरी (मे)** येथील जमिन स.क्र. 39/3,41/2,42/2,3 भुखंड क्र. 'अ' व 'ब' , क्षेत्र 802.63 चौ.मि.मध्ये बांधकाम करण्यास परवानगी खालील अटी व शर्तीच्या आधारे देण्यात येत आहे."

अटी व शर्ती :-

1) सदर जागेचा वापर व ईमारतीचा वापर रहिवासी/ वाणिज्य वापरा करीताच करण्यात येईल.
2) नियोजित बांधकामाची मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे तळ मजला +3 मजला यापेक्षा जास्त असु नये.
3) सदर जागेतील/जागेलगतच्या नाल्यास नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही व नाल्यास सुयोग्य मजबुतीकरण करणे आवश्यक राहील.
4) बांधकाम भुकंपरोधक साहीत्याने करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
5) विषयांकित जागेच्या अभिन्यासाला उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे भुंखड एकत्रिकरणासाठी आदेश क्र.प्र.क्र.211/एमआरसी-80/18 दि.5/10/2018 अन्वये परवानगी प्रदान करण्यात आलेली असुन या अभिन्यासातील भुखंडावर करण्यात येणाऱ्या बांधकामास या आदेशातील अटी बंधनकारक राहतील.
6) या बांधकाम परवान्याची मुदत परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासुन एक वर्षाची आहे.या कालावधीत बांधकाम पुर्ण न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे. नुतनीकरण प्रत्येक वर्षाची मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे. नुतनीकरण प्रत्येक वर्षाची मुदत संपण्यापुर्वी मुदतवाढ घेवुन तीन वर्षा पर्यंत मंजुर करता यईल.
7) बांधकाम सुरु करण्यात येत असल्याबाबतची सुचना या कार्यालयास विहीत नमुन्यात(Appendix "A"-Item-4 मध्ये) देण्यात यावी
8) जोत्यापर्यंत (Plinth level) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर याबाबतची माहीती विहीत नमुन्यात (Appendix "F" मध्ये) या कार्यालयास व नगर रचनाकार कार्यालयास देण्यात यावी.याप्रमाणे सदर कामास नगर रचनाकार कार्यालयाने विहीत नमुन्यात (Appendix "G" मध्ये) प्रमाणित केल्यानंतर पुढील काम सुरु करण्यात यावे.
9) उपयोगिता प्रमाणपत्र (Occupancy Certificate) मंजुर झाल्याशिवाय नविन ईमारत किंवा ईमारतीचा कोणताही हिस्स्याचा उपभोग करण्यास किंवा कोणत्याही व्यक्तीला वापर करण्याचा परवाना देता येणार नाही. तसे केल्यास अनधिकृत उपभोग केल्याबाबत अर्जदार आणि आर्कीटेक्ट /अभियंता हे गुन्ह्यास पात्र ठरतील. उपयोगिता प्रमाणपत्राकरीता ईमारत मालक व आर्किटेक्ट यांनी अपेंडीक्स (H) मध्ये बांधकाम पुर्ण झाल्याच्या नकाशाच्या प्रतिसह अर्ज उपविभागीय अधिकारी,वर्धा यांचेकडे सादर करावा.
10) ग्रामपंचायत **पिपरी (मे)** ता.वर्धा यांची मंजुरी/नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय बांधकाम करण्यात येवु नये. मंजुर बांधकाम नकाशाविरुध्द कोणतेही बांधकाम केल्यास ते अनधिकृत गृहीत धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. अनधिकृत

उपप्र - १
प्रत
प्रकरण 1420
24/1/22

बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,1966 नुसार जमिन मालक / विकासकर्त आर्किटेक्ट कार्यवाहीस पात्र ठरतील.

11) महाराष्ट्र प्रादेशिक योजनेच्या संबंधातील मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक संपुर्ण सॅनिटरी कार्य पुर्ण करण्यात यावे.

12) सिव्हर लाईनला पावसाच्या पाण्याची पाईप लाईन जोडण्यात येवु नये आणि त्याकरीता विकासकर्त्याने स्वतंत्र व्यवस्था करावी.

13) संबंधित नियोजन प्राधिकरण कार्यालयाचे किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा नगर रचना अधिकारी यांचे पडताळणी करीता ईमारतीचे बांधकाम सुरु असतांना मंजुर बांधकाम नकाशे नेहमी साईटवर उपलब्ध ठेवतील.

14) महाराष्ट्र प्रादेशिक योजनेच्या संबंधातील प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीतील संपुर्ण तरतुदी विकासकर्त्यास बंधनकारक राहतील.

15) भुखंडात पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

16) भुखंडावरील रिकाम्या जागेत विकासकर्त्याने नियमानुसार किमान आवश्यक झाडे लावावी व ती झाडे मोठी होतपर्यंत त्यांचे संगोपन करावे.

17) पाण्याची आणि सिव्हेज/डिस्पोजलची व्यवस्था विकासकर्त्यास स्वत: करावी लागेल.

18) भुखंडाच्या कडेला योग्य आकाराच्या व रस्त्यापासुन जवळ असेल अशा कचऱ्यांच्या टोपल्यांची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

19) जर नकाशात दर्शविलेल्या गणपत्रकात /आकडेमोड मध्ये विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी विसंगत अशी चुक/दोष आढळल्यास, ईमारतीचा / बांधकामाचा तो भाग जो नियमात बसत नाही. तो अनधिकृत ग्राह्य धरल्या जाईल.

20) बांधकामाच्या साहीत्याची अशा तऱ्हेने व्यवस्था करावी जेणेकरुन त्यामुळे ड्रेन, पावसाचे पाणी व वाहतुक इत्यादीना अडथळा निर्माण होणार नाही. यामुळे अडथळा निर्माण झाल्यास संबंधित नियोजन प्राधिकरण यांचे तर्फे कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

21) बांधकाम परवानगी करीता सादर केलेला + मालकी हक्क व इतर कागदपत्रांमध्ये काही दोष असल्यास अथवा सदरची कागदपत्रे खोटी व दिशाभुल करणारी असल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच याबाबत परवानगी धारकास जबाबदार धरुन भारतीय दंड विधान संहितेच्या तरतुदीनुसार फौजदारी कारवाईस पात्र धरण्यात येईल.

22) स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी (Structural Stability) संबंधी सक्षम स्थापत्य अभियंत्याकडील प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे.

23) नकाशे व आराखडे तयार करुन आराखडयानुसार सक्षम स्थापत्य अभियंत्याचे देखरेखी खाली बांधकाम पुर्ण करुन घेण्याची व त्याप्रमाणे बांधकाम हे भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या तरतुदीनुसार पुर्ण करुन घेण्याबाबत सक्षम अभियंत्याचा वास्तुशास्त्राचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. (Appendix "B" मध्ये)

24) उक्त वापराचे अनुषंगाने सौर उर्जेवर पाणी तापवण्याची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

25) नियोजित बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही. याची जबाबदारी अर्जदार / मालकाने घेतली पाहीजे.

26) वरील अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटीचा अगर शर्तीचा भंग केल्यास आदेश रद्द समजण्यात येईल.

27) सोबत मंजुर बांधकाम नकाशाची प्रत आहे.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा

प्रतिलीपी:1) नगर रचनाकार, वर्धा, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्या.वर्धा यांना माहीतीकरीता.

2) वास्तुशास्त्रज्ञ व नियोजकार अ.का नागपुर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ नागपुर,

3) सचिव, ग्रामपंचायत पिपरी (मे) ता.वर्धा यांना माहीतीकरीता.

प्रषक
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास
मंडळ, नागपूर

उपविभागीय अधिकारी,
वर्धा

वरुद - १